# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - ८
## सभावृत्तांत

दिनांक - २९.५.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २९.५.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी सभापती
२) मा.अविनाश (दादा)टेकावडे
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.जावेद रमजान शेख
७) मा.जगताप नवनाथ दत्तु
८) मा.भोसले राहुल हनुमंतराव
९) मा.चोंधे आरती सुरेश
१०)मा.भालेकर अरुणा दिलीप
११) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१२) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा. श्रीकर परदेशी - आयुक्त, मा.मुंढे, मा.कारचे, मा.ढेरे, मा.झुरे, मा.दुरगुडे, मा.गायकवाड,मा.बंब, - सहा.आयुक्त,मा.भंडारे - प्र.उपनगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.कांबळे - सह शहर अभियंता, मा. भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.अय्यर -प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी ,मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.ढगे, मा.निकम, मा.इंगळे, मा.जाधव, मा.जाधव, मा.कुदळे, मा.कपिले, मा.थोरात, मा.साळवी, मा.पठाण - कार्यकारी अभियंता, मा.पाटील - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक : ७) नागरवस्ती विभागासाठी शिलाई मशिन खरेदीबाबत.

विषय क्रमांक : ८) क प्रभाग कार्यक्षेत्रातील इंद्रायणी नदीमधील हायसिंथ पाणवनस्पती काढणेबाबत.

विषय क्रमांक : ९) मनपाच्या सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातील नगररचना विभागाच्या भूसंपादन निधी या लेखाशिर्षामधील तरतूदीमध्ये वाढ करणेबाबत.

विषय क्रमांक : १०) सायकल स्टँड चालविणेस देणेबाबत - मा.अश्विनी चिंचवडे, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक : ११) गिर्यारोहण मोहिमेस रक्कम देणेबाबत-मा.अश्विनी चिंचवडे, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक : १२) मानधनावर फायरमन पदावर नियुक्ती करणेबाबत - मा.अश्विनी चिंचवडे, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक : १३) मानधनावर नेमणूक करणेबाबत - मा.आरती चोंधे , मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक : १४) संत गाडगेबाबत स्वच्छता अभियांनांतर्गत स्वच्छता तेथे परमेश्वर हा नाटयप्रयोग करुन समाज प्रबोधनाचे काम करणेबाबत - मा. आरती चोंधे मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक : १५) तरतूद वर्ग करणेबाबत - मा.राहुल भोसले मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :१६) सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकामध्ये वाढ / घट करणेबाबत - मा.राहुल भोसले, मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :१७) मुदतवाढ देणेबाबत - मा.छाया साबळे मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

--------

दिनांक २२/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक - ५५९ विषय क्रमांक - १
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - प्रशासन
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. प्रशा/१/कावि/२६९/२०१२दि.७/४/१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ७/५/२०१२ ठराव क्र.७ नुसार,
विषय :- महापालिकेचे दोन जादा प्रभाग निर्माण करणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६० विषय क्रमांक - २
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - वायसीएमएच
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुंपुर/वायसीएमएच/६५/२०१२दि.१८/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील उच्चदाब वीज संच मांडणीचे सन २०११-१२ करीताचे वार्षिक निरिक्षणापोटी निरिक्षण शुल्क र.रू.४३,२००/- [र.रू.त्रेचाळीस हजार दोनशे] मा.विद्युत निरिक्षक, पुणे यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६१ विषय क्रमांक - ३
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - नगरसचिव
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भ:-मा.प्र.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/५८५/२०१२दि.१८/५/१२

मा.प्र.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६२ विषय क्रमांक - ४
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - क्रिडा
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/७२९/११दि.२२/१२/११
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ ठराव क्र.७
विषय - पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या ४९व्या वर्षातील विविध क्रिडा स्पर्धांना सन २०११-१२ करिता मनपाच्यावतीने आर्थिक पुरस्कार देणेबाबत.

विषय क्रमांक ४ विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६३ विषय क्रमांक - ५
दिनांक - २९/५/२०१२
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- १) मा.जयश्री गावडे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ ठराव क्र.८
विषय :- आंतरराष्ट्रीय स्पर्धेमधील सांघिक खेळातील खेळाडूंना आर्थिक मदत देणेबाबत..

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६४ विषय क्रमांक - ६
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२५/२०१२दि.२१/५/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे एप्रिल २०१२ मधिल अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ५६५ विषय क्रमांक - ७
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१/कावि/२५९/२०१२दि.२९/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विभागाकडील महिलांकरीता योजनेअंतर्गत लाभार्थींना शिलाई मशिनचे वाटप करणेसाठी शिलाई मशिन खरेदीकामी ई-निविदा क्र.२५/२०११-१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.श्री.बालाजी सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस पुणे व मे.राजेश सुईंग मशिन वर्ड, पुणे यांचे दर प्रति नग र.रु. ५३००/- प्रमाणे ४००० नगाचे एकुण र.रु.२,१२,००,०००/- दर स्विकृत करुन करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६६ विषय क्रमांक - ८
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - क प्रभाग
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/१५/कावि/५४१/२०१२दि.२९/५/१२

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क प्रभाग कार्यक्षेत्रातील इंद्रायणी नदीमधील हायसिंथ पाणवनस्पती काढणेचे काम मे.अण्णासाहेब मगर स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, नवी सांगवी दैनंदिन कामकाजाचे कर्मचा-यांचे हजेरीपत्रक व झालेल्या कामकाजाच्या दैनंदिन नोंदी आरोग्य

निरीक्षक यांचे नियंत्रणाखाली ठेवुन त्याचा दैनंदिन अहवाल प्रभाग कार्यालयाकडे देण्यात येईल. सदरचे काम मोठया प्रमाणात असले तरी जेवढे काम पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांकडुन होईल तेवढयाच कामाचे बिल अदा करण्यात येईल. सदर कामकाजामध्ये निर्माण झालेले हायसिंथ काढून नदी किना-यालगत टाकणेत येईल. पाण्यातुन हायसिंथ काढल्यानंतर ते सुकले जाते. तसेच हायसिंथ काढले तरी ते पुन्हा येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तरीपण प्रायोगिक तत्वावर व पावसाळा जवळ येत असलेने सदर कामकाज करुन घेणे आवश्यक वाटते म्हणुन सदर कामकाज कामी हायसिंथ निर्मुलन या लेखाशिर्षावर र.रु.१० लाख तरतुद आहे. त्यातुन सदरचा खर्च करणेत येईल सदरचे काम निविदा न मागविता मे. अण्णासाहेब मगर स्वयंरोजगारसेवा सहकारी संस्था मर्यादित, नवी सांगवी यांचेकडुन थेट पध्दतीने करुन घेणेकामी ५० मजुर प्रतिदिन ३००/- रुपये दराने प्रति मजुर नुसार २० दिवसात काम करुन करारनामा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६७ विषय क्रमांक - ९
दिनांक - २९/५/२०१२ विभाग - नगररचना व विकास
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-२/१४५/२०१२दि.२९/५/१२

मा.महापालिका आुयक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे संरक्षण विभागास एकुण र.रु. ६०.५२६४ कोटी अदा करणे आवश्यक आहे. नगररचना विभागाच्या सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकातील ३७.०० कोटी तरतुदींपैकी तरतुद र.रु. ३६,९९,२८,०००/- सद्यस्थितीत शिल्लक आहे. संरक्षण विभागास अदा करावयाची रक्कम व नगररचना विभागाच्या इतर भुसंपादन प्रकरणांसाठी र.रु. ५.०० कोटी रक्कमेची तरतुद वर्ग करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार नगररचना विभागाच्या भुसंपादन या लेखाशिर्षावर वाढीव र.रु. २९.०० कोटी वर्ग करणे आवश्यक आहे. सदरची वाढीव तरतुद र.रु. २९.०० कोटी सन २०१२-२०१३ चे अंदाजपत्रकातील विकासनिधीतील पाणी पुरवठा टप्पा क्र.१ साठी (मुख्य अंदाजपत्रक पुस्तक १ पान क्र.१९१ वरील) करण्यात आलेल्या र.रु. १००.०० कोटी मधुन वर्ग करण्यात आल्यावर या लेखाशिर्षावर एकुण रक्कम रु. ६६.०० कोटी येईल. वरीलप्रमाणे नगररचना विभागाच्या भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वाढीव तरतुद वर्ग करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६८ विषय क्रमांक - १०
दिनांक - २९/५/२०१२
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.अश्विनी चिंचवडे,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

साई सेवा केटरर्स यांस मोरवाडी आय.टी.आय मधील सायकल स्टँड जवळील मोकळी जागा कँटीनसाठी ३ वर्षे कालावधीकरीता मुलांचा सायकल स्टँड विनामुल्य चालविणेच्या अटीवर देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत

येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५६९ विषय क्रमांक - ११

दिनांक - २९/५/२०१२

सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.राहुल भोसले

संदर्भ:-मा.अश्विनी चिंचवडे,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

सागरमाथा गिर्यारोहण या पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी येथील गिर्यारोहण संस्थेतील ४ जणांचे पथक हिमालयातील एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या मोहिमेवर जाऊन या होतकरु आणि अत्यंत उत्साही गिर्यारोहकांनी पिंपरी चिंचवड शहराचे नाव उज्वल करण्याचे उद्दीष्ट ठेवुन एव्हरेस्ट शिखर सर करण्याची मोहीम यशस्वी केली आहे. मात्र त्यांचे नायक सागरमाथा या गिर्यारोहण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुळवे यांचे मोहिमेदरम्यान मोहिम पुर्ण होण्याआधीच उच्च रक्तदाबाने निधन झाले. या पार्श्वभूमीवर मोहीम यशस्वी केलेल्या सागरमाथा या पिंपरी चिंचवड शहरांतील गिर्यारोहण संस्थेस त्यांच्या यशाप्रीत्यर्थ उत्तेजनार्थ रु.५लाख मदत देण्यास व मयत रमेश गुळवे यांच्या कुटुंबीयांस रु. ५ लाख असे एकुण रक्कम रु. १० लाख गिर्यारोहण मोहिमेस प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५७० विषय क्रमांक - १२

दिनांक - २९/५/२०१२

सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.राहुल भोसले

संदर्भ:-मा.अश्विनी चिंचवडे,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशामक दलामध्ये फायरमन अभिनामाची पुरेशी पदे मंजुर नाहीत, त्यामुळे पिंपरी चिंचवड शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता फायरमन पदावरील कर्मचा-यांची उणीव भासते. तसेच अग्निशामक सारख्या अत्यंत महत्वाच्या विभागामध्ये पुरेसे प्रशिक्षित कर्मचारी असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने श्री. सागर हणमंत पवार हे फायरमन पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक, तांत्रिक अर्हता व अनुभव धारण करीत असून त्यांना मानधनावर सहा महिन्यासाठी फायरमन म्हणून नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५७१ विषय क्रमांक - १३

दिनांक - २९/५/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.राहुल भोसले

संदर्भ:-मा.आरती चोंधे,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसचिव पदावरील अधिकारी दि.३१/५/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. पिंपरी चिंचवड मनपाची सार्वत्रिक निवडणुक फेब्रुवारी २०१२ मध्ये झाली असून त्यामध्ये निर्वाचित झालेल्या सदस्यांचा कार्यकाल दि. १३ मार्च २०१२ पासून सुरु झालेला आहे. नवनिर्वाचित सदस्यांपैकी जवळ जवळ ७५% सदस्य हे प्रथमच सदस्य म्हणून निवडुन आलेले आहेत. त्यांना तसेच त्यामधील मा.पदाधिकारी यांना मा.महापालिका सभा,मा.स्थायी समिती सभा,मा.विशेष समित्या सभा व अन्य सभा याबाबत व महापालिकेच्या सभा कामकाजाबाबत व अन्य कामकाजाबाबत नियम, तरतुदी कार्यपध्दती यांची माहिती देण्यासाठी व सहाय्य करण्यासाठी नगरसचिव पदावरील अधिकारी हा अनुभवी व कार्यक्षम असणे आवश्यक आहे. वस्तुस्थितीत तसा अधिकारी १ जून २०१२ नंतर सध्यातरी उपलब्ध नाही. तसेच नगरसचिव हे पद सरळ सेवेने किंवा पदोन्नतीने भरणेसाठी कमीत कमी सहा सात महिन्यांचा कालावधी लागेल. त्यामुळे नगरसचिव पदावरुन दि. ३१ मे २०१२ रोजी सेवानिवृत्त होणारे श्री सुभाष काळे यांची महापालिकेच्या नगरसचिव पदावरील कामकाजाची आवश्यकता विचारात घेता व कायम स्वरुपी पद भरण्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेता त्यांची द.म.र.रु. २५,०००/- मानधनावर वाहन, दुरध्वनी, मोबाईल या नगरसचिव पदास देय असणा-या सुविधासह सहा महिने कालावधीसाठी नियुक्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५७२ विषय क्रमांक - १४
दिनांक - २९/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.आरती चोंधे,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

श्रीवस्ती नाटयसंस्था संपुर्ण मुंबईत व ठाणे जिल्हयात संत गाडगेबाबा अभियानांतर्गत “स्वच्छता तेथे परमेश्वर” हा नाटयप्रयोग करुन समाज प्रबोधनाचे काम करीत आहे. त्यांचा पुर्वानुभव लक्षात घेता त्याचप्रमाणे २०११-१२ वर्षामध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये यशस्वीपणे नाटयप्रयोग राबविल्याने पुढील कालावधीत प्रत्येक वॉर्डात १ या प्रमाणे १२८ पथनाटय प्रयोग तीन महिने कालावधीत प्रती प्रयोग रक्कम रुपये - ७,०००/- या दराने पथनाटय सादर करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७३ विषय क्रमांक - १५
दिनांक - २९/५/२०१२
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:- मा.राहुल भोसले, मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव -

पिंपरी येथे सर्व शिक्षा अभियानांतर्गत सहा वर्गखोल्यांची इमारत बांधणेचे काम सुरु आहे. सदरचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर कामाची सन २०१२-१३ चे

अंदाजपत्रकात पान क्र.२२२ अ.क्र.२३ वर र.रु.७,००,०००/- तरतूद आहे. सदरचे काम आत्तापर्यंत ९०% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम पूर्ण करणेसाठी या अंदाजपत्रकातील तरतूद अत्यंत अल्प आहे. सदर काम पूर्ण करणेसाठी र.रु.१८,००,०००/- ची आवश्यकता आहे. सदर कामाचे खर्चासाठी खालील कामातून तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| पान क्र. | अक्र | कामाचे नाव | वर्ग करावयाची र.रु. |
|---|---|---|---|
| २१८ | १२ | पिंपरी येथे डाल्को कंपनीजवळ रेल्वे भुयारी मार्ग बांधणे | १८,००,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७४ विषय क्रमांक - १६
दिनांक - २९/५/२०१२
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भः- मा.राहुल भोसले, मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव -

सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात खालील प्रमाणे वाढ घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ .क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रक पान क्र. | अंदाज पत्रक पान क्र. | सन २०१२-१३ ची तरतुद | सन २०१२-१३ ची आवश्यक तरतुद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क.४९ से.क्र.२५ व २७ व इतर ठिकाणी रस्त्याचे पॅचवर्क पध्दतीने डांबरीकरण करणे | ९९ | १७४ | १,००,०००/- | ११,००,०००/- | १०,००,०००/- | - |
| २ | प्रभाग क्र.५० मध्ये खराब झालेल्या रस्त्याचे पॅचवर्क पध्दतीने ंडांबरीकरण करणे | ९९ | १७५ | १,००,०००/- | ५,५०,०००/- | ४,५०,०००/- | |
| ३ | प्रभाग क्र. ५० से.क्र. २० मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे | १०३ | ३६ | १५,५०,०००/- | १,००,०००/- | - | १४,५०,०००/- |
| | | | | | | १४,५०,०००/- | १४,५०,०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७५ विषय क्रमांक - १७
दिनांक - २९/५/२०१२
सुचक :- मा. छाया साबळे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा. छाया साबळे, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १, २, ३ चे अधिकारी व कर्मचारी यांचे निवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्ष करणे बाबत प्रस्ताव शासनाला सादर केला आहे. परंतु श्री. सुभाष काळे - नगरसचिव, श्री.डॉ.राजशेखर अय्यर - वैद्यकीय संचालक व श्री. विलास भोसले - मुख्यलेखापाल हे ३१ मे २०१२ रोजी सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्या दिर्घ अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग महापालिकेस व्हावा म्हणून त्यांना ६ महिने कालावधीसाठी नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी )**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/८६२/२०१२
दिनांक - १/६/२०१२ चे लगत

**प्र. उपनगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८.**

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.